# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.09.2025** **वार-शुक्रवार**

---

**मुळा-मुठा नदी**

शहरातील मुळा-मुठा नदी सुशोभिकरणासाठी एकंदर 22 पूर्णांक 26 हेक्टर जागेचं भुसंपादन केलं जाणार आहे. येत्या आठवडयात या कामाबाबत संरक्षण खातं आणि महापालिका यांच्यात सांमजस्य करार होणार असल्याचं महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितलं.

**आवास योजना**

पुणे जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना 2.0 शहरी योजनेअंतर्गत केंद्र आणि राज्य शासनाकडून नागरिकांना घरं उपलब्ध करून देण्याचं काम सुरू आहे. म्हाडा पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळानं मुळशी तालुक्यातील नेरे आणि खेड तालुक्यातील रोहकल इथ या योजनेअंतर्गत घरं उपलब्ध करून देण्याचं पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकासमंडळाचे सभापती शिवाजी आढळराव पाटील यांनी सांगितलं.

**औंध टपाल पार्सल सुविधा**

औंध टपाल कार्यालयात आता अत्याधुनिक पार्सल पॅकेजिंग युनिट सेवा सुरू झाली आहे. भारतीय टपाल खात्याच्या पुणे शहर पश्चिम विभागानं या सुविधेला सुरुवात केली असून, युनिटचं उद्घाटन टपाल सेवांचे पुणे क्षेत्रीय संचालक अभिजित बनसोडे यांनी केलं. आगामी दिवाळीसाठी नागरिक, ई-कॉमर्स आणि लघु उद्योगधंद्यांनी या सुविधेचा लाभ घेण्याचं आवाहन पुणे शहर पश्चिम विभागाचे प्रवर अधीक्षक नितीन येवला यांनी केलं.

**मुंबा चित्रपट महोत्सव**

मुंबा फिल्म फाऊंडेशनतर्फे केंद्र सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालय तसंच नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या सहकार्यानं सहाव्या मुंबा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सावाचं पुण्यात आयोजन करण्यात आलं असून आज राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय इथं चित्रपट कसा पहावा या विषयावर समर नखाते यांचा मास्टर क्लास आयोजित करण्यात आला होता. यावेळी 'घड्याळांचा दवाखाना' हा लघुपट दाखवून समर नखाते यांनी अभ्यासपूर्ण भाष्य केलं.

**कृत्रिम बुद्धिमत्ता**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शालेय विद्यार्थी- विद्यार्थिनींना कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचं प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीनं यासंबंधीच्या सामंजस्य करारावर नुकतीच स्वाक्षरी केली. या करारानुसार आयबीएम कंपनीनं तयार केलेल्या इमर्जिंग टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमाचं प्रशिक्षण ऑनलाईन आणि प्रत्यक्ष अशा दुहेरी पद्धतीनं देण्यात येणार आहे. उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या नऊ शाळांमधील इयत्ता सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांना चार महिने कालावधीत मराठी तसंच इंग्रजी मध्येही हे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**जिल्हा वृत्तसेवा**

राज्य शासनाच्या 150 दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात विविध शासकीय योजना आणि उपक्रम राबवले जात आहेत. या अंतर्गत अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती हा एक महत्वाचा उपक्रम ठरला आहे. दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना रोजगार हा

या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून, शासकीय कार्यालयांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणंही महत्त्वाचं असल्याचं जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितलं.

**<u>औषध प्रशासन</u>**

शारदीय नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांकडून उपवासाचे अन्नपदार्थ मोठ्या प्रमाणावर खरेदी केले जातात. मात्र, अशा पदार्थांच्या सेवनामुळे अन्न विषबाधेचा धोका निर्माण होऊ शकतो, त्यामुळे नागरिकांनी अन्नपदार्थ खरेदी आणि सेवन करताना विशेष काळजी घेण्याचं आवाहन पुणे अन्न आणि औषध प्रशासन यांनी केलं आहे.

**<u>सह्याद्री रुग्णालय चौकशी</u>**

सह्याद्री रुग्णालयात यकृत प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रियेनंतर एका दांपत्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत आरोग्य विभागाने 8 सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली आहे. या घटनेनंतर रुग्णालयाच्या यकृत प्रत्यारोपणाचा परवाना तात्पुरता स्थगित करण्यात आला आहे.

**<u>पाणीगळती</u>**

पिंपरी चिंचवड शहरातील निगडी परिसरात मेट्रोचं काम सुरू असताना महापालिकेच्या मुख्य जलवाहिनीला धक्का लागून पाणीगळती सुरू झाली. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागानं युद्धपातळीवर काम सुरु करून गळती रोखण्याचे प्रयत्न केले.

**<u>सर्वेक्षण मोहीम</u>**

पिंपरी चिंचवड महापालिका आणि दिव्यांग भवन यांच्या सहकार्यानं शहरातील दिव्यांग नागरिकांची नोंद घेण्यासाठी व्यापक सर्वेक्षण मोहीम राबवली जात आहे. आशा सेविकांना दिव्यांग व्यक्तींची ओळख कशी करावी, संवेदनशील संवाद कसा साधावा, आणि डिजिटल ॲपच्या सहाय्यानं माहिती कशी नोंदवावी, याचं विशेष प्रशिक्षण दिलं आहे. ही मोहीम महानगरपालिकेच्या आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली राबवली जात असून, यामुळे शहरातील दिव्यांगांसाठी सेवा अधिक प्रभावी होण्याची अपेक्षा आहे.

**<u>आग</u>**

उंड्री भागातल्या मार्वल आयडियल सोसायटी या 14 मजली इमारतीत 12व्या मजल्यावर एका सदनिकेत आज दुपारी मोठ्या प्रमाणात आग लागली. अग्निशमन जवान आग विझवण्याचा प्रयत्न करत असताना अचानक सिलेंडर स्फोट होऊन अग्निशमन दलाचे 2 जवान आणि 3 नागरिक जखमी झाले असून एका मुलाचा मृत्यू झाला आहे. आता आग नियंत्रणात आणण्याच काम सुरु आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज सकाळ पासून आकाश ढगाळ असून काही भागात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. उद्याही जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**